6.5.3.

नाशिक शिक्षण प्रसारक मंडळाचे

# कै. बिंदू रामराव देशमुख कला व वाणिज्य महिला महाविद्यालय, नाशिकरोड

## विद्यार्थी कल्याण मंडळ सप्ताह

२५/०१/२०१४

### जिल्हास्तरीय अभिरुप संसद स्पर्धा अहवाल

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण मंडळ आणि कै. बिंदू रामराव देशमुख कला व वाणिज्य महिला महाविद्यालय, नाशिकरोड यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय अभिरुप संसद स्पर्धेचे आयोजन कै. बिंदू रामराव देशमुख कला व वाणिज्य महिला महाविद्यालय, नाशिकरोड येथील गोसावी सभागृहात दिनांक २५/०१/२०१४ रोजी दुपारी १२.०० वाजता नाशिक महानगरपालिकेचे नगरसेवक कुणाल वाघ यांच्या हस्ते संपन्न झाले. या प्रसंगी प्राचार्य अश्विनीकुमार भारद्वाज यांनी अध्यक्ष स्थान भूषविले. देशहिताचा विचार करुन काढलेले अध्यादेश स्वागतार्ह असून अविचारी अध्यादेश टिकत नाहीत. विद्यार्थी संसदेत काम करणा-या विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्व गुण विकसित व्हावेत आणि त्यांच्यात लोकशाही मूल्ये रुजावीत या उद्देशाने अभिरुप संसद स्पर्धा घेण्यात येते. अभिरूप संसदेत अद्यापपावेतो चर्चेसाठी महिला सुरक्षा विधेयक, जमीन अधिग्रहण विधेयक आणि किरकोळ क्षेत्रात परकीय गुंतवणूकीला मान्यता आदी विधेयक चर्चेला घेतले.

स्पर्धेसाठी जिल्ह्यातून सहा संघातील ७७ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. एका संघात प्रामुख्याने सहा स्पर्धक सहभागी झाले होते. यावेळी विविध संघांनी संसदेमध्ये चालणारे कामकाज आदर्श पध्दतीने कसे चालते याचे हुबेहुब सादरीकरण विविध सामाजिक, राजकीय अशा विषयांवर चर्चा करुन दाखविले. स्पर्धेचे परीक्षण प्रा.कुणाल वाघ व प्रा. व्ही. आर कर्नाटकी यांनी केले. या स्पर्धेत लासलगाव महाविद्यालयाने प्रथम क्रमांक पटकाविला. विजेत्यांना फिरता चषक, संविधान प्रत देऊन प्रथम गौरविण्यात आले. द्वितीय क्रमांक महिला महाविद्यालयाने पटकविला. त्यांना पुस्तकाच्या प्रती भेट देऊन गौरविण्यात आले. इतर स्पर्धकांना ग्रंथ भेट देण्यात आले. कार्यक्रमाचे समन्वयक म्हणून प्रा.प्रफुल्ल केतकर यांनी परिश्रम घेतले. डॉ.सौ. करुणा कुशारे यांनी मार्गदर्शन केले.

विद्यार्थी कल्याण अधिकारी | समन्वयक | प्राचार्य

PRINCIPAL
N.S.P.M's Late Bindu Ramrao Deshmukh
Arts & Commerce Mahila Mahavidyalaya,
Jail Road, Nasik Road-422 101

नाशिक शिक्षण प्रसारक मंडळाचे

**कै. बिंदू रामराव देशमुख कला व वाणिज्य महिला महाविद्यालय, नाशिकरोड**

## विद्यार्थी कल्याण मंडळ सप्ताह

**०२/०२/२०१५ ते ११/०२/२०१५**

**जिल्हास्तरीय अभिरुप संसद स्पर्धा अहवाल**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण मंडळ आणि कै. बिंदू रामराव देशमुख कला व वाणिज्य महिला महाविद्यालय, नाशिकरोड यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय अभिरुप संसद स्पर्धेचे आयोजन कै. बिंदू रामराव देशमुख कला व वाणिज्य महिला महाविद्यालय, नाशिकरोड येथील गोसावी सभागृहात दिनांक ०९/०२/२०१५ रोजी दुपारी १२.०० वाजता नाशिक महानगरपालिकेचे उपमहापौर मा. श्री. गुरुमीत बग्गा यांच्या हस्ते संपन्न झाले. या प्रसंगी भाजपाचे माजी शहर अध्यक्ष मा. श्री. लक्ष्मण सावजी व नगरसेविका मा. सौ. सविता दलवाणी यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेच्या सहसचिव सौ. वैजयंती पवार ह्या होत्या. देशहिताचा विचार करुन काढलेले अध्यादेश स्वागतार्ह असून अविचारी अध्यादेश टिकत नाहीत. तसेच संसदेचा दर्जाही खालवतो असे प्रतिपादन उपमहापौर बग्गा यांनी केले. मा. श्री. लक्ष्मण सावजी व सौ. वैजयंती पवार यांनी विद्यार्थ्यांना चांगल्या कार्यासाठी राजकारणात येण्याचे आवाहन केले. स्पर्धेचे प्रास्ताविक प्राचार्य भारद्वाज यांनी केले. सूत्रसंचलन प्रा. डॉ. करुणा कुशारे यांनी केले. पाहुण्यांचा परिचय डॉ. श्री. जीवन सोळंके यांनी केला तर आभार प्रा. राजू सानप यांनी मानले.

दुपार सत्रात अभिरुप स्पर्धेला प्रत्यक्ष सुरुवात झाली. स्पर्धेसाठी जिल्ह्यातून पाच संघानी सहभाग नोंदविला. एका संघात प्रामुख्याने सहा स्पर्धक सहभागी झाले होते. यावेळी विविध संघांनी संसदेमध्ये चालणारे कामकाज आदर्श पध्दतीने कसे चालते याचे हुबेहुब सादरीकरण विविध सामाजिक, राजकीय अशा विषयांवर चर्चा करुन दाखविले. स्पर्धेचे परीक्षण प्रा. ज्ञानोबा ढगे, प्रा. बाळकृष्ण शेलार यांनी केले. या स्पर्धेत गोखले एज्युकेशन सोसायटीच्या बी.वाय.के. महाविद्यालयाने प्रथम क्रमांक पटकाविला. विजेत्यांना फिरता चषक, संविधान प्रत देऊन प्रथम गौरविण्यात आले. द्वितीय क्रमांक महिला महाविद्यालयाने पटकविला. त्यांना पुस्तकाच्या प्रती भेट देऊन गौरविण्यात आले. कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, इगतपुरी, के.के.वाघ कला, वाणिज्य व संगणक महाविद्यालय, नाशिक व म.वि.प्रच्या समाजकार्य महाविद्यालयाला उत्तेजनार्थ बक्षिस देण्यात आले. इतर स्पर्धकांना ग्रंथ भेट देण्यात आले. कार्यक्रमाचे समन्वयक म्हणून डॉ. जीवन सोळुंके, सह समन्वयक प्रा. राजू सानप यांनी परिश्रम घेतले. डॉ. सौ. करुणा कुशारे यांनी मार्गदर्शन केले.

विद्यार्थी कल्याण अधिकारी | समन्वयक | प्राचार्य

**PRINCIPAL**
N.S.P.M's Late Bindu Ramrao Deshmukh
Arts & Commeroe Mahila Mahavidyalaya,
Jail Road, Nasik Road-422 101

कार्यशाळा घेण्यात आली. या कार्य शाळेत शिक्षण शास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य मा. स्वप्निल निर्मल, प्रा. पंकज नागमोती व प्रा. महेंद्र गायकवाड यांनी मार्गदर्शन केले. यात १०२ विद्यार्थीनीनी सहभाग नोंदवला. महाविद्यालयात जिल्हास्तरिय अभिरूप संसद स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत ९ महाविद्यालयांचा सहभाग होता. प्रथम पारितोषिक के.टी.एच.एम. महाविद्यालयाने तर द्वितीय पारितोषिक बी.आर.डी. महिला महाविद्यालयाच्या चमूने मिळविले. या कार्यक्रमाचे उद्घाटन ॲड. श्री. नितीन ठाकरे यांनी केले तर प्रमुख पाहुणे म्हणून वास्तुविशारद श्री. उन्मेष गायधनी यांनी मार्गदर्शन केले.

नोटाबंदीच्या काळात करन्सी नोट प्रेस कर्मचाऱ्यांनी अहोरात्र काम करून देश कार्य केले. त्याचप्रमाणे बँक कर्मचाऱ्यांनी देखिल नोट वाटप केले. त्यांच्या कार्याचा सत्कार विद्यार्थी कल्याण मंडळाच्या विद्यार्थिनीनी शुभेच्छा पत्रे, गुलाबपुष्पे व तिळगुळ देऊन केला. या प्रसंगी करन्सी नोट आय.एस.पी. मजदूर संघाचे जनरल सेक्रेटरी श्री. जगदिश गोडसे, कार्याध्यक्ष श्री. जुंद्रे यांनी मार्गदर्शन केले.

आरोग्य जागृती अभियानांतर्गत महिलांनी आपल्या आरोग्याची काळजी कशी घ्यावी या विषयी डॉ. पाटील यांनी मार्गदर्शन केले. अ.भा.वि.प. या संस्थेने आयोजित केलेल्या साहित्य संमेलनाच्या ग्रंथदिंडीत महाविद्याने प्रथम पारितोषिक पटकावले. महाविद्यालयातील शितल सरोदे, शालिनी पवार, अनुष्का लांडे, दुर्गा गडदे यांनी त्र्यंबकेश्वर महाविद्यालयाने आयोजित केलेल्या ट्रेकिंग शिबिरात सहभाग नोंदवला. लोकनेते व्यंकटराव हिरे, पंचवटी महाविद्यालत आयोजित केलेल्या वादविवाद स्पर्धेत सोनाली माने भाग्यश्री गंधे यांनी सहभाग नोंदविला. सिन्नर महाविद्यालयात आयोजित केलेल्या व्यक्तिमत्व विकास कार्यशाळेत जयश्री नाठे, जेजुरकर प्रियंका, निशा सोनवणे, अश्विनी पगारे, ढमाले रोहिणी, गायकर सुजाता यांनी सहभाग नोंदविला.

## ाष्ट्रीय सेवा योजना

महाराष्ट्र शासनाने त्यांच्या कृषी दिनाचे औचित्य साधत राज्यात ८ कोटी वृक्ष लागवड करण्याचे निश्चित केले असुन त्यानुषंगाने विद्यापीठाच्या सुचनेनुसार महाविद्यालय व दत्तक ग्राम येथे वृक्षारोपण कार्यक्रम आयोजित करण्यात आला. त्यात मुलींना वृक्ष लागवड, पर्यावरण रक्षण या विषयी मार्गदर्शन करण्यात आले. तसेच विद्यार्थीनींनी वृक्ष दत्तक घेवुन जोपासना करण्याची शपथ घेतली, या उपक्रमासाठी नाशिक महानगर पालिका यांनी ४० रोपे मोफत दिली त्यांची लागवड महाविद्यालय परिसरात करण्यात आली.

राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने रक्षाबंधन हा सण नाविण्यपूर्ण रीतीने साजरा केला जातो त्यानुषंगाने आत्महत्या ग्रस्त शेतकऱ्यांच्या मुलांसाठी चालवले जाणारे 'आधारतीर्थ आधार आश्रम' त्र्यंबकेश्वर येथे विद्यार्थीनींनी मुलांना राखी बांधुन बहीण-भावाच्या नात्याचा हा सण साजरा केला. यावेळी सर्व विद्यार्थीनी महाविद्यालयातील प्राध्यापक वर्गानी स्वेच्छेने गोळा केलेली रक्कम आधाराश्रमातील मुलांच्या भोजनासाठी रुपये ५००० मात्र व भेटवस्तु देण्यात आल्या.

Nashik Shikshan Prasarak Mandal ,Nashik
Late.Bindu Ramrao Deshmukh,
Arts & Commerce Mahila Mahavidyalaya
Sane Guruji Nagar, Nashik Road, Nashik -422101
url:http://nspm.mahilacollege.in,email.nspmacmm@yahoo.co.in, Tel.:0253-2465967
(ID.No.PU/NS/AC/54/1998)

140

Date- 28/01/2017

# जिल्हास्तरीय अभिरुप संसद : २५ जानेवारी २०१७ अहवाल

नाशिक शिक्षण प्रसारक मंडळाचे कै.बिंदू रामराव देशमुख कला व वाणिज्य महिला महाविद्यालय,नाशिकरोड व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय अभिरुप संसद स्पर्धा दिनांक २५ जानेवारी २०१७ रोजी प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला महाविद्यालयात संपन्न झाली.

या स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी प्रमुख उद्घाटक म्हणून मा.ॲड श्री.नितीन ठाकरे हे उपस्थित होते. त्यांनी या प्रसंगी संसदीय शासन पध्दतीत अभ्यासू संसदपटूची महत्वाची भूमिका असते असे सांगितले. प्रा.मधू दंडवते, मा.श्री.अटल बिहारी वाजपेयी या सारख्या अभ्यासू संसद पटूंनी त्यांची कारकिर्द गाजवली. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे मा.श्री.उन्मेष गायधनी, वास्तुविशारद,नाशिक हे होते. त्यांनी महाविद्यालयीन जीवनात निवडणूकांचे महत्व पटवून देतांना विद्यार्थ्यांची संसद असावी, या संसदेची निवड विद्यार्थ्यांमधून करावी असे सूचविले. याचा फायदा प्रभावी व अभ्यासू नेतृत्व निर्मितीसाठी होईल असेही प्रतिपादन त्यांनी केले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रा.डॉ.समीर लिंबारे हे होते. त्यांनी अध्यक्षीय मनोगतात लोकशाही प्रक्रियेत नेतृत्वाची महत्वाची भूमिका असते, सक्षम व प्रभावी नेतृत्व निर्मितीसाठी महाविद्यालयाचे योगदान असते असे सांगितले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यार्थी कल्याण अधिकारी प्रा.डॉ.सुषमा हसबनीस यांनी केले. पाहुण्यांचा परिचय व आभार प्रा.डॉ.जीवन सोळंके यांनी केले तर सूत्रसंचलन प्रा.श्री.राजू सानप यांनी केले.

या स्पर्धेसाठी नाशिक जिल्ह्यातील ९ महाविद्यालयातील विद्यार्थी सहभागी झाले होते. या स्पर्धेत **१) मातृत्व लाभ विधेयक -२०१६,२) GST - विधेयक ३)कर सुधारणा विधायक २०१६ ४)महाविद्यालयातील जंक फूड बंदी ५) कॅशलेस व्यवहार , ६) महाविद्यालयीन सार्वत्रिक निवडणूका** हे विषय चर्चेसाठी ठेवले होते.

या स्पर्धेत के.टी.एच.एम महाविद्यालयाने ' महाविद्यालयीन निवडणूका ' हे विधेयक सादर करुन विजेतेपद मिळविले तर कै.बिंदू रामराव देशमुख कला व वाणिज्य महिला महाविद्यालय,नाशिकरोड ने ' मातृत्व लाभ विधायक २०१६ ' हे विधायक सादर करुन उपविजेते पद मिळविले. विजेता व उप विजेता संघास फिरते चषक देऊन गौरविण्यात आले. या स्पर्धेतून उत्कृष्ट संसदपटू म्हणून के.टी.एच.एम.कॉलेज, नाशिक मधील श्री.विजयकुमार ठक्कर तेसच निफाड महाविद्यालयातील श्री.राहुल निरभवणेची निवड करण्यात आली. महिला सक्षमीकरण व उत्कृष्ट संसदपटू म्हणून कला व वाणिज्य महाविद्यालय, इगतपुरी येथील विद्यार्थिनी कु.कोमल शेजवळ हिस रुपये ३००/- रुपये रोख व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून प्रा.श्री.हरिष खैरनार, प्रा.श्री.विनोद निरभवणे, प्रा.श्री.कृष्णा शहाणे व पत्रकार श्री.वाघचौरे यांनी काम केले.

PRINCIPAL
N.S.P.M's Late Bindu Ramrao Deshmukh
Arts & Commerce Mahila Mahavidyalaya
Jail Road, Nasik Road-422 101

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,पुणे

व

ना.शि.प्र.मंडळाचे

**कै.बिंदू रामराव देशमुख कला व वाणिज्य महिला महाविद्यालय, नाशिकरोड.**

यांच्या संयुक्तविद्यमाने आयोजित

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर एक दिवसीय जिल्हास्तरीय अभिरुप संसद स्पर्धा २५/०१/२०१८ : अहवाल**

नाशिक शिक्षण प्रसारक मंडळाचे कै.बिंदू रामराव देशमुOEा कला व वाणिज्य महिला महाविद्यालय, नाशिकरोड व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ.बाबासाहेब आंबेडकर एक दिवसीय जिल्हास्तरीय अभिरुप संसद स्पर्धा दिनांक २५ जानेवारी २०१८ रोजी प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला महाविद्यालयात संपन्न झाली.

स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी मा.प्रा.कुणाल वाघ ( माजी नगरसेवक ) हे उपस्थित होते. त्यांनी या प्रसंगी लोकशाही पंधरवाडा या उपक्रमांतर्गत अभिरुप संसद स्पर्धा, मतदार दिन तसेच ७३वी व ७५वी घटना दुरुस्ती व तिचे महत्व विद्यार्थ्यांना पटवून द्यावे तसेच विद्यार्थी व्यक्तिमत्व विकास व नेतृत्वगुण या दृष्टीकोनातून महाविद्यालय स्तरावर अभिरुप संसद स्पर्धेच्या माध्यमातून लोकशाही सक्षमीकरण होईल असे सांगितले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.लीना पांढरे ह्या होत्या. त्यांनी अध्यक्षीय मनोगतात महाविद्यालय स्तरावर अभ्यासक्रमाव्यतिरिक्त संसदेत चालणारे कामकाज कशा पध्दतीने उत्कृष्ट होऊ शकते यासाठी या स्पर्धेचे महत्व आहे असे सांगितले. या स्पर्धेच्या माध्यमातून समाजाशी संबंधित असलेले ज्वलंत विषय या स्पर्धेतून चर्चीले जातात.

या कार्यक्रमाबरोबर लोकशाही पंधरवाडा अंतर्गत **राष्ट्रीय मतदार दिन** साजरा करण्यात आला. राज्यशास्त्रविभागांतर्गत पोस्टर सादरीकरण स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेचे उद्घाटन मा.प्राचार्या डॉ.लीना पांढरे यांनी केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा.कुणाल वाघ हे होते.

या कार्यक्रमांचे प्रास्ताविक प्रा.राजू सानप यांनी केले. पाहुण्यांचा परिचय डॉ.सुषमा हसबनीस यांनी केला तर सूत्रसंचलन प्रा.संदिप गाडेकर यांनी केले. प्रा.विनोद निरभवणे यांचे कार्यक्रमाचे आभार मानले.

या स्पर्धेसाठी नाशिक जिल्ह्यातील १० महाविद्यालयातील ११५ विद्यार्थी सहभागी झाले होते. या स्पर्धेत हे विषय चर्चेसाठी ठेवले होते. **१.तिहेरी तलाक २. भूसंपादन विधेयक २०१७ ३. GST विधेयक २०१७ ४.शिक्षण क्षेत्रात OEाजगी कंपनी भागीदारी - विधेयक २०१७.** या स्पर्धेत एच.व्ही.देसाई महाविद्यालय,पुणे ' तिहेरी तलाOEा ' हे विधेयक सादर करुन विजेतेपद मिळविले तर मराठा विद्या प्रसारक मंडळाचे समाजकार्य महाविद्यालय ने ' तिहेरी तलाOEा ' हे विधायक सादर करुन उपविजेते पद मिळविले. विजेता व उप विजेता संघास चषक देऊन राज्यशास्त्र अभ्यासमंडळावर निवड झालेले डॉ.कापडी सर यांचे हस्ते व महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.लीना पांढरे यांचेहस्ते गौरविण्यात आले. या स्पर्धेतून उत्कृष्ट संसदपटू म्हणून सुजाता सांगळे, महिला महाविद्यालय नाशिकरोड व मोहिनी सोनवणे, पिंपळगांव महाविद्यालय तसेच पुरुष उत्कृष्ट संसदपटू बोंबले अक्षय व शिरसाठ समाधान यांची निवड करण्यात आली.या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून प्रा.डॉ.संजय काळे व

PRINCIPAL
N.S.P.M's Late Bindu Ramrao Deshm
Arts & Commerce Mahila Mahavidyal
...-422 101